**नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१०**
**CNR No. MHRT050008572010**

## <u>निशाणी ४६, ४८ व ५० खालील संयुक्तिक आदेश</u>

वादी क्र. १ चे मुखत्यार श्री. प्रशांत अशोक राणे यांनी प्रतिवादी क्र. ३ दत्ताजीराव गोविंद आंब्रे हे दि.१५.०१.२०१९ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधींना विहित मुदतीत दाव्यामध्ये समाविष्ट न केल्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्याबाबत अर्ज निशाणी ४६ सादर केला आहे. तसेच दुसरा अर्ज निशाणी ४८ हा मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करण्याकरीता २०५८ दिवसांचा झालेला विलंब माफ करण्यासाठी सादर केला आहे. तसेच तिसरा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांना दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी व तशी दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी सादर केला आहे. सदर तिन्ही अर्जांच्या पुष्ट्यर्थ वादी क्र. १ चे मुखत्यार यांनी स्वतंत्र प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

**०२.** वादी क्र. १ चे मुखत्यार श्री. प्रशांत राणे यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा हा दि.१३.०२.२०१३ रोजी वादीकडून तजवीज न केल्यामुळे खारीज करण्यात आला. त्यानंतर सदर दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज ४/२०१४ हा न्यायालयाने ०५.११.२०२२ रोजी आदेश पारीत करुन सदर अर्ज मंजूर केला व त्यानुसार सदर दावा हा पुन्हा फैलावर घेण्यात आला. त्यानंतर न्यायालयाने दि.०२.१२.२०२२ रोजी वादी व प्रतिवादी यांना नोटीस काढण्याचा आदेश पारित केला. त्यानुसार प्रतिवादी यांना नोटीस काढण्यात आली. बेलीफ यांनी सादर केलेल्या नोटीसच्या अहवालावरुन प्रतिवादी क्र. ३ हे मयत असल्याचे माहित पडले. त्यानंतर वादीने अधिक माहिती घेतली असता प्रतिवादी क्र. ३ हे दि.१५.०१.२०१९ रोजी मयत झाल्याचे माहित पडले. त्यामुळे सदरचा दावा हा मयत प्रतिवादी क्र. ३ विरुध्द अबेट झाला आहे व त्याच्या वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी २०५८ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर विलंबामागे वादीचा कोणताही वाईट हेतू अथवा निष्काळजीपणा नव्हता. सदरचा दावा हा गुणदोषांवर

निकाली होण्याकरीता प्रतिवादी क्र. ३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून झालेला विलंब माफ करण्यात यावा व त्यांच्या वारसांना अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती अर्जामध्ये केली आहे.

**०३.** वादीकरीता विधीज्ञ श्री.सुधीर बुटाला यांचे सहाय्यक विधीज्ञ कु. देवरुखकर यांनी युक्तिवाद केला. प्रस्तुत अर्जावर इतर प्रतिवादींचे म्हणणे न आल्यामुळे तिन्ही अर्ज एकतर्फा निकाली करण्यात येतात. तिन्ही अर्जांचे अवलोकन केले. याबाबत काही दुमत नाही की, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये अधिकार क्षेत्राबाबतचा प्राथमिक मुद्दा निश्चित करण्यात आला व त्या प्राथमिक मुद्दयावर वादीकडून युक्तिवाद करण्यात न आल्यामुळे व वादीच्या सततच्या अनुपस्थितीमुळे सदर दावा हा दि.१३.०२.२०१३ रोजीच्या आदेशानुसार खारीज करण्यात आला. त्यानंतर वादीने सदर दावा हा पुन्हा फैलावर घेण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज ४/२०१४ सादर केला व तो मंजूर करण्यात आला. त्यानंतर सदरचा दावा हा पुन्हा फैलावर घेण्यात आला. यावरुन हे स्पष्ट होते की, सदर दावा खारीज केल्यानंतर पासून ते मूळ फैलावर येईपर्यंतच्या दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र. ३ यांचा दि.१५.०१.२०१९ रोजी मृत्यू झाला. त्यामुळे साहजिकच सदरचा दावा हा फैलावर नसल्यामुळे वारसांना अभिलेखावर आणता आले नाही. प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरुध्द अबेटमेंटचा कोणताही आदेश पारीत झाल्याचे दिसून येत नाही. असे असले तरीही मयत प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांना मुदतीत अभिलेखावर आणणे अपेक्षित असते अन्यथा सदरचा दावा हा त्यांच्याविरुध्द अबेट करण्यात आला असा निष्कर्ष निघतो. प्रस्तुत अर्जामध्ये दिलेले कारण संयुक्तिक असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत तिन्ही अर्ज नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने मंजूर करण्यालायक आहेत. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. तिन्ही अर्ज (निशाणी ४६, ४८ व ५०) मंजूर करण्यात येतात.

२. मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या वारसांना अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. वादी यांनी अर्ज निशाणी ५० मध्ये मयत प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांना एका आठवडयाच्या आत अभिलेखावर घेवून तशी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.01.03 16:58:06 +0530

**(संजय मो. चव्हाण)**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खेड**

**दिनांक – ०२.०१.२०२५**

**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order below Exh. 46,48,50 in Case No. | : | RCS No. 56/2010 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 02/01/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 02/01/2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 03/01/2025 |